# जाहिरात

सातारा जिल्हा परिषद, सातारा

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेकरिता शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. शापोआ-2009/प्र.क्र. 91/प्राशि- 4 मंत्रालय मुंबई दिनांक 10 फेब्रुवारी, 2010 अन्वये शिक्षण विभाग (प्राथमिक) सातारा जिल्हा परिषद सातारा अंतर्गत रिक्त असणारी डाटा एंन्ट्री ऑरपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात, 11 महिन्यांच्या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | कंत्राटी पदाचे नांव | एकूण पदांची संख्या | अनिवार्य शैक्षणिक पात्रता | एकूण देय मासिक परिश्रमिक / मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | डाटा एन्ट्री ऑपरेटर | रिक्त पद 01<br>संभाव्य रिक्त पद 01<br>एकूण 02 | 1. किमान इ. 12 वी पास (पदवीधर उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल)<br>2. मराठी टंकलेखन 30 शब्द प्र. मि.<br>3. इंग्रजी टंकलेखन 40 शब्द प्र.मि.<br>4. MS-/CIT किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण | रुपये 25,000/- |

उमेदवाराचे वय किमान 18 वर्षे व कमाल 35 वर्षे या दरम्यान असावे.

परीक्षेचे स्वरुप- वरील तक्ता कॉलम क्र. 4 चे परिच्छेदामधील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांची मराठी टायपिंग- 30 शब्द प्रतिमिनिट व इंग्रजी टायपिंग 40 प्रति मिनिट आणि संगणक ज्ञानाची प्रात्यक्षिक परीक्षा यासाठी सर्व मिळून 100 गुण देण्यात येतील. प्रस्तुत प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये किमान 50 गुण प्राप्त होणारे उमेदवार डाटा एन्ट्री ऑपरेटर च्या पदावरील निवडीसाठी पात्र राहतील.

जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचे , www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या विहित नमुन्यात भरलेले अर्ज,शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, सातारा या कार्यालयात दिनांक 23/09/2025 अखेर सकाळी 10.30 ते सायंकाळी 6.00 या वेळेत, समक्ष अथवा पोष्टाने, सुट्टीचे दिवस वगळून स्विकारले जातील. भरती प्रक्रियेचे वेळापत्रक, अटी व सुचना www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहे.

भरती प्रक्रियेच्या वेळापत्रकामध्ये बदल करणे, पदांची संख्या कमी जादा करणे अथवा भरती प्रक्रियेस स्थगिती देण्याचे सर्वाधिकार जिल्हा परिषद निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

सही /-
(अनिस नायकवडी)
सदस्य सचिव
जिल्हा निवड प्रक्रिया समिती तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
सातारा जिल्हा परिषद, सातारा

सही /-
(याशनी नागराजन) (भा.प्र.से.)
अध्यक्ष
जिल्हा निवड प्रक्रिया समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद, सातारा

# जाहिरात

सातारा जिल्हा परिषद, सातारा

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेकरिता शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. शापोआ-2009/प्र.क्र. 91/प्राशि- 4 मंत्रालय मुंबई दिनांक 10 फेब्रुवारी, 2010 व दिनांक 29/10/2020 अन्वये शिक्षण विभाग (प्राथमिक) सातारा जिल्हा परिषद सातारा अंतर्गत रिक्त असणारी डाटा एंन्ट्री ऑरपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात, 11 महिन्यांच्या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | कंत्राटी पदाचे नांव | एकूण पदांची संख्या | अनिवार्य शैक्षणिक पात्रता | एकूण देय मासिक परिश्रमिक / मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | डाटा एन्ट्री ऑपरेटर (प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना) | रिक्त पद 01<br>संभाव्य रिक्त पद 01<br>एकूण 02 | 1. किमान इ. 12 वी पास (पदवीधर उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल)<br>2. मराठी टंकलेखन 30 शब्द प्र. मि.<br>3. इंग्रजी टंकलेखन 40 शब्द प्र.मि.<br>4. MS-/CIT किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण | रुपये 25,000/- |

**अर्ज करावयाची अंतिम तारीख** 23/09/2025 **आहे**.

**निवड पध्दती**

1. उमेदवाराचे वय किमान 18 वर्षे व कमाल 35 वर्षे या दरम्यान असावे.

2.1 शैक्षणिक व व्यावसायिक अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारास इ. 10 वी, इ. 12 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची एकत्रित बेरीज करुन त्यामध्ये उमेदवार पदवीधर असल्यास त्यास 10 गुण बोनस देण्यात येतील. गुणांकन करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारांना संगणक परिक्षेकरीता, एका पदासाठी गुणानुक्रमे 12 उमेदवार याप्रमाणे बोलावण्यात येतील.

2.2 सदर यादीमधील उमेदवारांची मराठी टायपिंग 30 शब्द प्रतिमिनिट व इंग्रजी टायपिंग 40 शब्द प्रति मिनिट आणि संगणक ज्ञानाची प्रात्याक्षिक परीक्षा घेण्यात येईल. यासाठी सर्व मिळून 100 गुण देण्यात येतील व अशी एकूण 100 गुणांची परीक्षा एकाच दिवशी घेण्यात येईल. प्रस्तुत प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये किमान 50 गुण प्राप्त होणारे उमेदवार निवडीसाठी पात्र राहतील.

2.3 उपरोक्त नं 2.1 व 2.2 मधील गुण एकत्रित करून गुणानुक्रमे मंजूर पदासाठी निवड यादी प्रसिध्द केली जाईल आणि त्यानुसार सदर उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती देण्यात येईल व तेवढयाच, पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द केली जाईल.

सूचना-

3.1 उमेदवारांनी विहीत नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज सादर करावा, सदर अर्जाच्या पाकिटांवर डाटा एन्ट्री ऑपरेटर(प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना) पदाकरीता अर्ज असे नमुद करावे.

3.2 अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वय, अनुभव इत्यादी संदर्भातील कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात.

3.3 अर्ज दिनांक 23/09/2025 पर्यंत सकाळी 10.30 ते सायं. 06.00 या वेळेत, समक्ष अथवा पोष्टाने, सुट्टीचे दिवस वगळून स्विकारले जातील. त्यानंतर आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

3.4 पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द झालेनंतर त्या उमेदवारांनी www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावरून परीक्षेचे प्रवेश पत्र डाउनलोड करून त्यावर उमेदवाराचा अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून व साक्षांकित करून प्रवेश पत्रावर नमूद असलेल्या परिक्षेच्या ठिकाणी नमूद वेळेच्या अगोदर उपस्थित रहावे. सविस्तर सूचना प्रवेश पत्रावर देण्यात येतील.

3.5 परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांकडून नियुक्तीपूर्वी शासनाकडील विहीत नमुन्यात करारनामा करुन घेण्यात येईल आणि त्यासोबत उमेदवारावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदासंबंधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्ती कार्यपध्दती यासंबंधी आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे आधिकार शासनास राहतील.

3.6 डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी पध्दतीच्या कर्मचाऱ्यास नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाहीत.
3.7 सदर पदांची भरती कंत्राटी पध्दतीने करावयाची असल्याने बिंदू नामावली प्रमाणे पदे भरण्याची आवश्यकता नाही.
4. अंतीम निवड यादी प्रसिध्द करणेपुर्वी रिक्त पदांची संख्या वाढल्यास याच यादीमधून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.
4. भरती प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| 1 | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | 23/09/2025 |
| 2 | प्राप्त अर्जाच्या छानणीचा दिनांक | 24/09/2025 ते 26/09/2025 |
| 3 | गुणानुक्रमे गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे | 29/09/2025 |
| 4 | गुणानुक्रमे प्रसिध्द यादी संदर्भात आक्षेप मागविणे | 30/09/2025 ते 01/10/2025 |
| 5 | अंतिम पात्र व अपात्र यादी प्रसिध्द करणे | 03/10/2025 |
| 6 | पात्र उमेदवारांची प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक | 13/10/2025 |
| 7 | निवड यादी व प्रतिक्षा यादी जाहिर करण्याचा दिनांक | 17/10/2025 |

भरती प्रक्रियेच्या वेळापत्रकामध्ये बदल करणे, पदांची संख्या कमी जादा करणे अथवा भरती प्रक्रियेस स्थगिती देण्याचे सर्वाधिकार जिल्हा परिषद निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

सही /-
(अनिस नायकवडी)
सदस्य सचिव
जिल्हा निवड प्रक्रिया समिती तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
सातारा जिल्हा परिषद, सातारा

सही /-
(याशनी नागराजन) (भा.प्र.से.)
अध्यक्ष
जिल्हा निवड प्रक्रिया समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद, सातारा